# प्रेसनोट

स्थानिक गुन्हे शाखा,गडचिरोलीदिनांक ०७.०५.२०२०

| पो.स्टे /अप.क्र./कलम | घटनास्थळ/घटनाता.वेळ | फिर्यादी व आरोपीतांचेनाव |
|---|---|---|
| चामोर्शी अप.क्र.२३८/२०२०<br>कलम ६५(क),(ब),(फ),८३<br>महा.दारुबंदी अधि. | मौजालालडोंगरी परी.<br>लार्डोबानाल्याजवळ<br>०३किमी पुर्व<br>**घटनाता. वेळ** :-<br>दि.०५/०५/२०२० चे ११:३० ते<br>१४:१० वा.पर्यंत | फिर्यादी सरकारतर्फेस.फौ./७८७दादाजी मंगरुजीकरकाडेनेम.स्थानिक गुन्हे शाखा पोलीसअधिक्षककार्यालय,गडचिरोली<br>**पाहीजे आरोपीतांचेनाव** :-<br>१) अविनाश आनंद सरकार वय २५ वर्षे,रा. लालडोंगरीता. चामोर्शी जि. गडचिरोली२) अज्ञात आरोपी |
| **माहिती कशी प्राप्त झाली** | **अवैधदारु मधील सक्रिय अधिकारी/कर्मचारी** | |
| गोपनिय बातमीदाराकडुन मिळालेल्या माहिती वरुन | सफौ/दादाजीकरकाडे,मपोना/पुष्पा कन्नाके, पोशि/सुनिल पुठ्ठावार,पोशि/मंगेशराऊत, पोशि/सिद्देश्वर बाबर,चानापोशि/ ईश्वर पेंदाम | |

गडचिरोली जिल्हयातील अवैधदारुविक्रींतसेच बेकायदेशीरदारु वाहतुकीस आळा बसावा याकरीता मा.श्री.शैलेश बलकवडे, पोलीस अधिक्षकगडचिरोली यांनीगडचिरोली जिल्हयातील अवैधदारु—जुगार व ईतर अवैध व्यवसायांवर रेड करुन प्रभावीपणेकायदेशीर कार्यवाही करण्याचीजबाबदारी स्थानिक गुन्हे शाखेकडे सोपविली आहे.

स्थानिक गुन्हे शाखेकडे सोपविण्यात आलेलीजबाबदारी पार पाडत असतांनादिनांक ०५/०५/२०२० रोजीस्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस पथकास गोपनिय सुत्राकडुन माहीती मिळाली कि,मौजालालडोंगरी (चामोर्शी) येथील वरीलनमुद ठोकदारु विक्रेते अविनाश आनंद सरकार, रा. लालडोंगरीता. चामोर्शी जि. गडचिरोली हे अवैध मोहा दारु विक्री करण्याचे उद्देशाने मौजा लालडोंगरी परीसरात लार्डोबानाल्या जवळ हातभट्टी लावुन मोहा दारुगाळतो व चिल्लरविक्रेत्यांना पुरवठाकरतो. अशा खबरेकरुन मा. डॉ. मोहीत कुमार गर्ग अपर पोलीस अधिक्षक (प्रशासन) यांना माहीती देवुनत्यांचे आदेशानेव मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेकडील वरीलनमुद पोलीस पथक हे अवैधदारु रेड कारवाई करीता रवाना होवुन मौजाचामोर्शी येथे पोहचुन दोन स्थानिक पंचांना सोबतघेवुन मिळालेल्या माहीतीचे आधारे मौजा लालडोंगरी परीसरात शोधघेत असतांना लाडोंबानाल्या जवळ दोनईसम संशयीतरित्यादिसले त्यांना आवाज दिला असतात्यांना आमचेकडे पाहुन पोलीस असल्याचे संशय असल्याने जंगलच्या दिशेने पळुन गेले.त्यांचा पाठलागकेला असताते मिळुन आले नाही. तेव्हा पंचांनी पळुन जाणाऱ्या एक ईसमास नावानिशी ओळखुन सांगीतलेकि, समोर पळणारा अविनाश आनंद सरकार रा.लालडोगरी आणि दुसराईसम अज्ञात असल्याचे सांगीतले. घटनास्थळी जावुनपाहणी केली असता.१) किंमत ३,६०,०००/- रुपये प्रत्येकी २०० लिटर क्षमतचे १८ नग प्लॉस्टीक ड्रम ज्यामध्ये ३,६०० किलो मोहा सळवा प्रती लिटर १०० /- रुपये प्रमाणे, २) किंमत ८०,००० रुपये प्रत्येकी १०० लिटर क्षमतेच ०८ नग प्लॉस्टीकड्रम ज्यामध्ये ८००किलो मोहा सळवा प्रती लिटर १०० प्रमाणे, ३) किंमत ५०,०००/-रुपये प्रत्येकी ५० लिटर क्षमतेच ०५नग प्लॉस्टीकड्रम ज्यामध्ये २५०लिटर हातभट्टी मोहा दारु प्रती लिटर २०० प्रमाणे, असा **एकुण ४,९०,०००/- रुपयेकिमतीचा मुद्देमाल** घटनास्थळावरुन जप्ती करुन ताब्यात घेवुन गुन्हयातील आरोपीतांनाविरुध्द पोलीस स्टेशनचामोर्शी येथे वरील नमुद कलमान्वये गुन्हा नोंदकरण्यात आला आहे.

सध्या संपुर्णदेशातकोवीड-१९ या साथीच्या रोगाचीआपत्तीजनक परीस्थीतीनिर्माणझालेली असुन महाराष्ट्र राज्यात लॉकडाऊन असल्याने सदरचेकालावधीत अवैधदारुविक्री व बेकायदेशीरदारु वाहतुक होणार नाही. याकरीता स्थानिक गुन्हे शाखेकडील पथक अहोरात्रो अवैधदारु रेड मोहीम राबवुन प्रभावीपणेकारवाई केली आहे.स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाकडुनगडचिरोली जिल्हयात होत असलेल्या प्रभावी कारवाई मुळे अवैधदारुविक्रीकरणारेतसेच बेकायदेशीररित्यादारुची वाहतुक करणाऱ्या लोकांचेधाबेदणानले आहे.





